## महाराष्ट्र राज्यातील सर्वंकष धोरणानुसार स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रमाबाबत उमेदवारांसाठीच्या सर्वसाधारण सूचना

**महाराष्ट्र राज्यातील आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेमधून स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रमासाठी नामवंत खाजगी संस्थेमधून प्रशिक्षण देण्यासाठी अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी सामायिक प्रवेश परीक्षा (Common Entrance Test-CET) घेण्यात येणार आहे. या करिता इच्छुक व पात्र उमेदवारांकडून त्या त्या योजनेच्या लाभासाठी अर्ज मागविण्यासाठी जाहिरात देण्यात आलेली आहे. त्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना खलीलप्रमाणे आहेत...**

१. एका वेळेस आपण एकाच योजनेसाठी online अर्ज सादर करू शकता. आपणास एकापेक्षा अधिक योजनेकरिता अर्ज करावयाच्या असल्यास Registration अंती आपणास प्राप्त झालेल्या Login ID व Password चा वापर करून. Dashboard पानावरील New Application या tab वर क्लिक करून इतर योजनांकरिता अर्ज भरता येईल. तथापि, याकरिता उमेदवाराने योजनानिहाय आवश्यक शैक्षणिक अर्हता, वय व अर्जात नमूद केल्यानुसार इतर पात्रता व अटी पूर्ण केलेल्या असाव्यात.

२. प्रशिक्षणासाठी प्रवेश परीक्षा अर्ज करते वेळेस उमेदवाराकडे महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) असणे अनिवार्य आहे.

३. उमेदवाराकडे सदर योजनेच्या लाभासाठी जात/जमात प्रमाणपत्र (Cast Certificate) असणे अनिवार्य आहे.

४. उमेदवाराकडे सदर योजनेच्या लाभासाठी वैधता प्रमाणपत्र (Cast Validity) असणे बंधनकारक आहे. तसेच उमेदवाराची जमात ही महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीच्या यादी मधील असणे अनिवार्य आहे.

५. ज्या उमेदवारांनी वैधता प्रमाणपत्राकरीता अर्ज केला आहे परंतु त्यांना अद्याप जमात वैधता प्रमाणपत्र मिळालेले नाही, ते अर्ज सादर करू शकतात. तथापि अशा उमेदवाराची संबंधित योजनेकरिता लाभार्थी म्हणून निवड झाल्यास मूळ कागदपत्रे पडताळणी (Document Verification) च्या वेळी त्या उमेदवाराने जमात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. मूळ कागदपत्रे पडताळणी वेळी जर उमेदवाराकडे जमात वैधता प्रमाणपत्र नसेल तर आपला प्रवेश रद्द होईल याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

६. शासकीय सेवेत असणाऱ्या उमेदवारास ह्या प्रशिक्षण योजनेचा लाभ घेता येणार नाही. अशाप्रकारची खोटी माहिती सादर केल्यास किंवा माहिती लपविल्यास व तसे या कार्यालयाच्या निदर्शनास आल्यास चुकीची व दिशाभूल करणारी माहिती सादर केल्याबद्दल आपला प्रवेश तात्काळ रद्द करण्यात येईल व आपल्यावर दंडात्मक कारवाई करण्यात येईल. तसेच अशा उमेदवारांना पुढे भविष्यात संस्थेच्या कोणत्याही योजनेचा लाभ मिळणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

७. आपण एखादी स्पर्धा परीक्षा पास झाले असल्यास किंवा कोणत्याही ठिकाणी कामासाठी रुजू होणार असल्यास अशा उमेदवारांनी सदर योजनेसाठी अर्ज करू नये. तसेच ज्या उमेदवारांची मुख्य परीक्षा उत्तीर्ण झाली आहे अथवा ज्यांची मुलाखत होणार आहे किंवा पूर्ण झाली आहे अशा उमेदवारांनी सदर योजनेसाठी अर्ज करू नये.

८. मुद्दा क्र ०७ मध्ये, नमूद केल्याप्रमाणे जर एखाद्या उमेदवाराने सदर योजनेसाठी लाभ घेण्यास अर्ज सादर केला आणि परीक्षेबाबतच्या सर्व प्रक्रिया पूर्ण करून आपला संबंधित संस्थेमधील प्रशिक्षण कार्यक्रमासाठीचा प्रवेश अंतिम झाल्यावर जर तुम्हाला कोणत्याही कारणास्तव सदर प्रशिक्षण कार्यक्रम सोडायचा झाल्यास जितके दिवस तुम्ही सदर प्रशिक्षणाचा लाभ घेतलेला आहे त्या कालावधीत जे जे लाभ आपणास प्राप्त झाले असतील ते सर्व लाभ आपणास प्रशासकीय संस्थेस परत करावे लागतील व प्रशासकीय संस्थेमार्फत करण्यात येणाऱ्या दंडात्मक कारवाईस सामोरे जावे लागेल, याची उमेदवारांनी पूर्णतः नोंद घ्यावी.

९. आपण सदर योजनेची CET उत्तीर्ण करून, मूळ कागदपत्रे तपासून घेऊन संबंधित प्रशिक्षण संस्थेत प्रवेशित झाल्यास आपणास सदरचा जितके महिने कालावधीचा प्रशिक्षण कार्यक्रम असेल तो पूर्ण करणे बंधनकारक आहे. या प्रशिक्षण कालावधी दरम्यान आपणास इतर कोणत्याही कारणास्तव प्रशिक्षण कार्यक्रम अर्धवट सोडता येणार नाही. प्रशिक्षण कार्यक्रम अर्धवट सोडल्यास प्रशासकीय संस्थेकडून आपणांवर दंडात्मक कारवाई केली जाईल.

१०. उमेदवाराने खोटे कागदपत्रे सादर करून योजनेचा लाभ घेतला असल्याचे निदर्शनास आल्यास त्यांचेकडून संपूर्ण प्रशिक्षणाचा खर्च वसूल करून कायदेशीर दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

११. उमेदवारांनी आपला Online Application Form भरल्यानंतर सदर Form download करण्यासाठी ज्या दिवसापर्यंत मुदत दिली आहे त्या दिवसापर्यंतच आपला Application Form प्रिंट करून घ्यावा.
त्यानंतर उमेदवारांना कोणत्याही परिस्थितीत कार्यालयाकडून Application Form मिळू शकणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१२. कोणत्याही योजनेच्या घेण्यात येणाऱ्या सामायिक प्रवेश परीक्षेसाठी (CET) आपली कोणतीही मूळ कागदपत्रे न तपासता आपणास सदर परीक्षेस बसण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. याचा अर्थ आपण ज्या योजनेची परीक्षा दिली आहे त्या योजनेसाठी पात्र झालात असे होत नाही.

१३. आपला प्रवेश हा पूर्णता आपल्या सामायिक प्रवेश परीक्षेच्या (CET) मेरीट निकालावर अवलंबून असेल.

१४. CET परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर, आपले नाव निवड यादीत (मेरीट यादीत) आल्यावर, आपल्याला आपली मूळ कागदपत्रे संबंधित संस्थेच्या संकेतस्थळावर देण्यात आलेल्या सूचनेतील विहित कालावधीत तपासून घेणे अनिवार्य आहे. दिलेल्या विहित कालावधीत जर आपण आपले कागदपत्रे तपासून घेतली नाहीत किंवा कार्यालयाशी याबाबत कोणताही संपर्क साधला नाहीत तर आपला प्रवेश तात्काळ रद्द करण्यात येऊन त्या जागी प्रतीक्षा यादीतील उमेदवाराची निवड करण्यात येईल, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१५. ठरविण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार "सामायिक प्रवेश परीक्षा (CET)" घेण्यात येणार असल्याने सर्व योजनांची परीक्षा संपल्यावरच सर्व संबंधित योजनांच्या "सामायिक प्रवेश परीक्षांचा (CET)" निकाल किमान ०७ ते १० दिवसांनी संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. याबाबत केवळ संस्थेच्या संकेतस्थळांवरच सूचना प्रसिद्ध केल्या जातील याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. उमेदवारांनी याबाबत कार्यालयात दूरध्वनीद्वारे संपर्क साधून विचारणा करू नये तसेच कार्यालयातील कोणत्याही अधिकारी किंवा कर्मचारी यांच्या भ्रमणध्वनीवर संपर्क साधू नये.

१६. परीक्षा व निकाल प्रक्रिया पूर्व झाल्यानंतरच संबंधित योजनांच्या प्रशिक्षण कार्यक्रमाकरीता संस्था निवड करण्यासंदर्भात पात्र झालेल्या उमेदवारांसाठी पुढील सूचना संस्थेच्या संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

१७. प्रवेश अर्ज प्रक्रिया, सामायिक प्रवेश परीक्षा वेळापत्रक, CET परीक्षेचे प्रवेश पत्र (Admit Card), परीक्षेचा निकाल, मूळ कागदपत्रे तपासणी, संस्था निवडीबाबतची सूचना ई. सर्व माहिती संस्थेच्या संकेतस्थळावर वेळोवेळी सादर केली जाणार आहे. या बाबत उमेदवारांना संबंधित संस्थेकडून कोणताही पत्रव्यवहार/संपर्क केला जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१८. एका योजनेसंदर्भात अर्ज सादर करताना पहिल्या वेळी देण्यात आलेले परीक्षे संदर्भातील जिल्हा निवडीचे प्राधान्यक्रम (Exam City 1,2,3,4,5 preference) हे त्या उमेदवाराकडून भरल्या जाणाऱ्या प्रत्येक योजनेच्या अर्जाकरीता कायम राहतील. योजना निहाय वेगवेगळे जिल्हा निवडीचे स्वातंत्र्य असणार नाही याची नोंद घ्यावी व त्यानुसार विचारपूर्वक जिल्हा निवडीचे पर्याय द्यावे तसेच आपण निवडलेल्या प्राधान्यक्रमात कुठलाही बदल केला जाणार नाही.

१९. उमेदवाराने अर्जात नोंदविल्या व्यतिरिक्त कोणतेही परीक्षा केंद्र/जिल्हा/Exam city रद्द करण्याचा आणि/किंवा इतर काही केंद्रे जोडण्याचा अधिकार तसेच अपरिहार्य परिस्थितीत उमेदवाराला उपलब्ध

क्षमता व रिक्त जागा नुसार कोणतेही परीक्षा केंद्र वाटप करण्याचा अधिकार स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण सनियंत्रण व अंमलबजावणी समितीने राखून ठेवला आहे.

२०. उमेदवारांनी आपला Online Application Form काळजीपूर्वक भरावा त्यामध्ये, आपला आधार क्रमांक व आपला मोबाईल क्रमांक काळजीपूर्वक भरावा.

२१. उमेदवाराने CET परीक्षेबाबतचे परीक्षा प्रवेश पत्र (Admit Card/ Hall Ticket) तसेच परीक्षेबाबत असलेल्या सूचनांची माहिती संबंधित संस्थेच्या वेबसाईटवरून download करावी.

२२. नियमानुसार मुली व दिव्यांग, अनाथ यांच्यासाठी जागा आरक्षित ठेवल्या जातील. परंतु आरक्षित जागेवर महिला व दिव्यांग, अनाथ पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर जागा उमेदवारांच्या गुणानुक्रमे पात्र असलेल्या उमेदवारास दिली जाईल.

२३. लक्षणीय दिव्यांगत्व असलेल्या उमेदवारांना तसेच उत्तरे लिहिण्यासाठी सक्षम नसलेल्या दिव्यांग उमेदवारांना लेखनिकाची मदत आणि/ अथवा अनुग्रह कालावधीची आवश्यकता असल्यास संबंधित उमेदवाराने ऑनलाईन अर्ज सादर केल्यापासून ०७ दिवसाचे आत आवश्यक प्रमाणपत्र/ कागदपत्रासह विहित नमुन्यात आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेकडे लेखी विनंती अर्ज सादर करणे आवश्यक आहे. यासंदर्भात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या शासन परिपत्रक क्र. दिव्यांग २०१९/प्र. क्र. २००/दि. क. २, दिनांक ०५ ऑक्टोबर, २०२१ या नुसार कार्यवाही करण्यात येईल.

२४. प्रशिक्षणार्थी व त्याच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु. ८ लाखाची मर्यादा (अक्षरात रक्कम रु. आठ लक्ष फक्त) देण्यात आली आहे. उमेदवारांचे उत्पन्न रु. ८ लाखापेक्षा जास्त असल्यास त्यांना सदर योजनेचा लाभ देता येणार नाही.